जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -९९ दिनांक - १०/०२/२०२५**

युनिट ३ गुन्हे शाखा व वारजे माळवाडी पोलीस ठाणे यांची संयुक्त कामगिरी

## गावठी पिस्टल सह एका इसमास केले जेरबंद

दि.०८/०२/२०२५ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वारजे माळवाडी पोलीस ठाणे श्री.विश्वजित काईंगडे व पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ३ श्री.रंगराव पवार यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ३ कडील अंमलदार वारजे माळवाडी पोलीस ठाणे हददीत घडणारे गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन पेट्रोलींग करीत असताना पोलीस अंमलदार प्रतिक मोरे यांना बातमी मिळाली की,एक इसम हा डी.पी रोड कर्वेनगर पुणे येथे रोडवर थांबलेला असुन त्याच्याकडे पिस्टल आहे अशी त्याचे वर्णनासह बातमी मिळाल्याने वारजे माळवाडी पोलीस ठाणे कडील पोलीस उप-निरीक्षक श्री.संजय नरळे यांचे सह युनीट ३ कडील अंमलदार यांनी सदर ठिकाणी जावुन बातमीतील वर्णनाचे इसमाचा शोध घेतला एक इसम संशयीतरित्या हालचाल करीत असल्याचे दिसल्याने सदर इसमांस ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **कुणाल सचिन घावरे वय.२८ वर्षे रा.नानासाहेब बराटे कॉलनी लेन नं.कर्वेनगर पुणे** असे असल्याचे सांगितले नंतर त्याची अंगझडती घेता त्याचे कब्जात कि.रु ४१,०००/-चे देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व दोन पिवळया धातुचे दोन काडतुसे मिळुन आल्याने ते पोलीस उप-निरीक्षक संजय नरळे यांनी जप्त करून ताब्यात घेतले.

नमुद इसम नामे कुणाल सचिन घावरे वय.२८ वर्षे रा. नानासाहेब बराटे कॉलनी लेन नं १ कर्वेनगर पुणे याचे विरूदध अग्नीशस्त्र बाळगले बाबत पोलीस अंमलदार प्रतिक मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वारजे माळवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर- ७०/२०२५ भारतीय शस्त्र अधि कलम ३(२५),महाराष्ट्र पोलीस अधिकलम ३७(१)सह १३५,नुसार गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक सचिन तरडे वारजे माळवाडी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उप-आयुक्त,परि-३ पुणे शहर,श्री संभाजी कदम मा.सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री.गणेश इंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग श्री.भाऊसाहेब पठारे,यांचे सुचनेनुसार,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वारजे माळवाडी पोलीस स्टेशन श्री विश्वजीत काईंगडे, व पोलीस निरिक्षक, युनिट ३ गुन्हे शाखा श्री रंगराव पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे),वारजे माळवाडी पोलीस ठाणे श्री.निलेश बडाख, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक संजय नरळे, पोलीस अंमलदार विनोद भंडलकर, विनोद जाधव, गणेश सुतार,हरिष गायकवाड, प्रतिक मोरे, इसाक पठाण, यांनी केलेली आहे.


महाराष्ट्र पोलीस
वारजे माळवाडी पोलीस ठाणे